| MHRG070011822022 | **अर्ज दाखल दिनांक : २८/०८/२०२२.**<br>**अर्ज पंजीकृत दिनांक: २८/०८/२०२२**<br>**निकाल दिनांक : १९/१२/२०२२.**<br>**कालावधी : ३ महिने,२१ दिवस** |
|---|---|

**दिवाणी चौकशी अर्ज क.१३३/२०२२**
**निशाणी क.१७/ब**

१. **श्रीमती.मिनाक्षी विलास धुरू**
वय: ६३ वर्षे, धंदा :रिटायर्ड
रा.विश्व—विनय को.हौ.सो.माहिम(पूर्व) मुंबई

२. **श्री.आकाश विलास धुरू**
वय: ३६ वर्षे, धंदा :नोकरी
रा.विश्व—विनय को.हौ.सो.माहिम(पूर्व),मुंबई

३. **कु.अश्विनी विलास धुरू**
वय: ३१ वर्षे, धंदा :नोकरी

रा.राजश्री शाहू नगर,माहिम(पूर्व) मुंबई ४०००१७ .........**अर्जदार**

**विरूध्द**

कोणीही नाही. ........... **सामनेवाला**

..........................................................................................

**अर्जदाराचे वकील — ॲड. एम.जे.ओसवाल.**

..........................................................................................

**बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ अन्वये अर्जदार हे वारस असल्याबाबत नाममात्र घोषित करून मिळण्याकरिता अर्ज**

..........................................................................................

## :: न्यायनिर्णय::

**{जाहीर केल्याचा दिनांक १९/१२/२०२२}**

१. प्रस्तुतचा अर्ज अर्जदार क १ ते ३ यांचे तर्फे वारस दाखला मिळणेबाबत दाखल केला आहे.

२. अर्जदार क १ यांचे पती, अर्जदार क २ व ३ यांचे वडील

कै.विलास रमाकांत धुरू हे दिनांक ०४/०२/२०२१ रोजी मौजे माहिम मुंबई येथे मयत झाले आहेत. अर्जदार क्र १ ते ३ हे एकमेव वारस आहेत. कै. विलास रमाकांत धुरू मौजे कशेळे, ता.कर्जत, जि.रायगड येथील रहिवासी होते. अर्जदार हेच कायदेशीर वारस असल्याने सदर जमीन मिळकतीवर हक्क व अधिकार बजावणीकरिता वारसान प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याने सदर अर्ज दाखल केलेला आहे.

३. अर्जदारांतर्फे वकिलांचा युक्तिवाद ऐकुन खालील मुद्दे माझ्या विचारार्थ उपस्थित झाले, त्यांचे निष्कर्ष मी त्यासमोर त्याखालील कारणांसह पुढीलप्रमाणे देत आहे :—

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | अर्जदार क्र १ ते ३ हे कै. विलास रमाकांत धुरू यांचे मृत्यूनंतर अर्जदार हेच त्यांचे कायदेशीर वारस आहेत का? | होय. |

## कारणमिमांसा

**मुद्दा क्र.१ साठी**

४. अर्जदार यांनी त्यांच्या कथनाप्रित्यर्थ त्यांचे शपथपत्र (नि.११) दाखल केले आहे. अर्जदार यांनी अर्जासोबत कै. विलास रमाकांत धुरू यांच्या मृत्यू दाखल्याची प्रत (नि.१२) दाखल केली आहे. अर्जदार यांनी अर्जासोबत मौजे कशेळे ता.कर्जत जि.रायगड येथील जमिनीचा ७/१२ उतारा (नि.१५) दाखल केली आहे. अर्जदार यांनी दि.२९.०८.२०२२रोजीचे कुळअखत्यारपत्र (नि.१३) दाखल केली आहे. अर्जदार यांचे आधारकार्डची छायांकित प्रत, नि ४ च्या यादीसोबत दाखल केलेल्या आहेत. अर्जदार यांनी '' दैनिक जनखुलासा'' वर्तमानपत्रातील जाहिर नोटीस दि. २४.०९. २०२२ (नि.१४) सादर केली आहे. अर्जदार यांनी पुरावा बंद पुरसिस (नि.

१६) दाखल केली आहे.

५. अर्जदार यांच्या शपथपत्रातील मजकूर त्यांच्या अर्जातील कथनांचा पुर्नु:च्चार आहे. '' दैनिक जनखुलासा'' वर्तमानपत्रात जाहीर नोटीस काढण्यात आली, परंतु एक महिन्याच्या कालावधीपर्यंत कोणीही त्याला हरकत घेतलेली नाही. अर्जदार यांनी दाखल केलेल्या कागदपत्रांवरुन त्यांच्या कथनांना पुष्टी मिळते. अर्जदार यांचा अर्ज विनाआव्हानित राहिला आहे. अर्जदार यांनी दाखल केलेल्या दस्तऐवजांवरुन कै.विलास रमाकांत धुरू यांच्या मृत्युला पुष्टी मिळते. त्यामुळे अर्जात नमूद कारणांकरिता अर्जदार क्र १ ते ३ हेच वारस दाखला मिळण्यास पात्र असल्यामुळे मुद्दा क्र.१ चे निष्कर्ष होकारार्थी नोंदवून मी खालील आदेश पारीत करते —

## :: <u>आदेश ::</u>

१. अर्ज मंजुर करण्यात येत आहे.

२. अर्जदार क्र १ ते ३ हेच कै. विलास रमाकांत धुरू यांचे कायदेशिर वारस असल्याने तसा वारस दाखला त्यांचे नावे देण्यात यावा.

३. अर्जदारांनी योग्य ते न्यायालयीन मुद्रांक शुल्क भरावे.

ठिकाण: कर्जत **(पी.एस.आपटे)**

दि. १९/१२/२०२२ सह दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर, कर्जत
जिल्हा—रायगड.